# प्रसिध्दी पत्रक

पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड आस्थापनेच्या सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक ०२.०४.२०२३ रोजी सकाळी ०८.३० वाजता घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी निर्गमीत करण्यात आलेले policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घ्यावे. लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता सूचना खालीलप्रमाणे -

## उमेदवारांसाठी सूचना :-

१) मैदानी चाचणीच्यावेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवाराकडे असतील तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. तसेच स्वत:चे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुंद केलेले फोटोची एक प्रत सोबत आणावी.

२) लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.

३) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी दोन तास अगोदर सकाळी ०६.०० वा. पोहोचणे अपेक्षित आहे. परिक्षेस येण्यास विलंब झाल्यास कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही अशा उमेदवारांना परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच त्यांना लेखी परिक्षेकरिता पुन्हा संधी दिली जाणार नाही.

४) उत्तरपत्रिका कार्बनलेस ओ.एम.आर. प्रकारची दोन प्रतीत असेल व दुय्यम प्रत उमेदवारास त्याच्या सोबत घेऊन जाण्यास परवानगी देण्यात आली आहे.

५) OMR Sheet वरील सुचनांचे काटकोरपणे पालन करावे. तसेच फक्त काळ्या शाईचे बॉल पॉंईट पेन सोबत आणावे.

६) OMR Sheet वर स्वत:ची ओळख उघड होईल असे कोणतेही चिन्ह नमुद करु नये / नांव लिहू नये. खाडाखोड अथवा पुनर्लेखन करु नये. असे आढळून आल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

७) उमेदवार कॉपी करताना आढळून आल्यास त्याच्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८) कोणीही उमेदवारांनी सॅक / बॅग अथवा किंमती वस्तू सोबत आणून नयेत त्या गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची नाही.

९) परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

१०) परीक्षा केंद्रात मोबाईल फोन / डिजीटल वॉच / डिजीटल डायरी / मायक्रोफोन / कॅलक्युलेटर / नोट पेड / नोटस् पुस्तके / ईअरफोन / hearing aide device इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहित्य आण्ण्यास सक्त मनाई आहे असे करणारा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

११) अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परिक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका / तक्रार असल्यास त्या संदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड (भरती अध्यक्ष) यांच्या नांवाने रुपये २००/- शुल्कासह हजर राहून लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

१२) उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या भूलथापांना व आमिषाला बळी पडू नये गैरप्रकार करताना कोणी आढळून आल्यास नियंत्रण कक्ष पिंपरी चिंचवड ०२०-२७३५२५०० / ०२०-२७३५२६०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**( डॉ. संजय शिंदे )**
**अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.**